# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
## नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा व्दारा संचालित,
# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

---

## रासेयोच्या वतीने संत गाडगेबाबा स्मृतिदिन सप्ताह निमित्ताने व्याख्यान

## दिनांक २७ डिसेंबर, २०२१

---

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने संत गाडगेबाबा स्मृतिदिन सप्ताह निमित्ताने दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते श्री. संतोष अरसोड हे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीत डॉ. रामचंद्र बुटले तसेच डॉ. असरार खान आय.क्यू.ए.सी. समन्वयक हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास माहुलकर यांनी भुषविले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये श्री. संतोष अरसोड यांनी संत गाडगेबाबा हे प्रबोधन पंढरीचे वारकरी कसे ठरतात हे सांगताना ते म्हणतात की, 'गाडगेबाबांनी तुमच्या माझ्या कल्याणाचा विचार देणारं प्रबोधन केले, विठ्ठलाचा शोध सर्वसामान्य माणसांमध्ये घेवून पंढरपूरामध्ये जाऊन प्रबोधन केले म्हणून तो पंढरीचा वारकरी ठरतो.' याप्रसंगी त्यांनी रासेयोच्या माध्यमातून आपल्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करायची असेल तर आपल्या महापुरूषाची चरित्र वाचली पाहिजे, अशाप्रकारचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. विलास माहुलकर सर यांनी समाजातील दांभिकता, अलिकडच्या काळातील दूरचित्रवाणीवरील अंधश्रध्दा वाढविणारे कार्यक्रम, शोषणाचे बदलले प्रकार अतिप्रमाणात वाढलेला धर्मभोळेपणा, संधीसाधूपणा इत्यादी बाबींचा उल्लेख करून सद्य:स्थितीत समाजासमोर नवीन आव्हान उभी आहेत त्यांचा सामना डोळसपणे करणे गरजेचे आहे यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. नंदकुमार भाकरे यांनी केले. तर सूत्रसंचालन कु. अश्विनी गावंडे बी. भाग. २, तर आभारप्रदर्शन कु. गायत्री भाग्यवंत बी. ए.भाग.२ या विद्यार्थीनीने केले. या कार्यक्रमाकरिता डॉ.दिपक कुटे, डॉ. सुनील ढेरे, डॉ. विकास निंघोट, डॉ. गणेश पवार, डॉ. विजय खोब्रागडे, प्रा. अतुलकुमार सारडे, प्रा. प्रकाश तेलगोटे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुजाता नाईक व रासेयो स्वयंसेवक वैभव इंगोले, पवन निनावे, विक्रम धकाते, लोकेश ढोमणे, निखील शिखरे, अनुश्री वाहेकर, गायत्री कुंभारे, मनिषा सोळंके, मनीषा निंभोळकर मेघा कुरसंगे या विद्यार्थ्यांनी केले.






### कीर्तनात चारित्र्य घडविण्याची क्षमता

#### बोरीअरब येथे स्मृतिदिन सप्ताह : मान्यवरांनी केले मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

बोरीअरब : कीर्तन ही महाराष्ट्राची सांस्कृतिक संपत्ती आहे. संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनात समाजाचे चारित्र्य घडविण्याची क्षमता होती, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते संतोष अरसोड यांनी केले.

येथील कला व वाणिज्य महाविद्यालय रासेयोच्या वतीने संत गाडगेबाबा स्मृतिदिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यात 'प्रबोधन पंढरीचा क्रांतिकारी संत गाडगेबाबा' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून अरसोड बोलत होते. त्यांनी गाडगेबाबांचे कीर्तन माणसाला जगायला शिकविते, असे सांगितले. गाडगेबाबांच्या कीर्तनामागे विवेकवादी, विज्ञानवादी, कार्यकारण भाव शोधणारा समाज निर्माण व्हावा, असा हेतू असल्याचे सांगितले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास माहुलकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. रामचंद्र बुटले, प्रा. डॉ. असरार खान, नितीन कोल्हे होते. प्रा.डॉ. दीपक कुटे, प्रा.डॉ. सुनील ढेरे, प्रा.डॉ. विकास निघोट, प्रा.डॉ. गणेश पवार, प्रा.डॉ. विजय खोब्रागडे, प्रा.डॉ. अतुलकुमार सारडे, प्रा. प्रकाश तेलगोटे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.डॉ. नंदकुमार भाकरे, संचालन अश्विनी गावंडे, आभार गायत्री भाग्यवंती यांनी मानले. प्रा.डॉ. सुजाता नाईक, वैभव इंगोले, पवन निनावे, विक्रम धकाते, लोकेश ढोमणे, निखिल शिखरे, अनुश्री वाहेकर, गायत्री कुंभारे आदींनी परिश्रम घेतले.

बोरीअरब येथे सप्ताहात मार्गदर्शन करताना संतोष अरसोड व उपस्थित मान्यवर.